महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

पुणे महानगरपालिकेच्या झोपडपट्टयांमधील मुलांना त्यांच्या घरापर्यंत जाऊन संगणकाचे प्रशिक्षण देण्याबाबत

(१) ८२६२ (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या झोपडपट्टयांमधील मुलांना त्यांच्या घरापर्यंत जाऊन संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी योजनेची सुरुवात करण्यासाठी १३ लाख रुपये खर्च करुन सुसज्ज अशा संगणक प्रयोगशाळा असलेल्या सहा बसेसपैकी केवळ एकाच बसचा वापर सद्यःस्थितीत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार खरेदी केलेल्या सर्वच संगणक बसचा वापर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :(१) पुणे महानगरपालिकेच्या शरद संगणक योजनेअंतर्गत संगणकयुक्त मोबाईल बस द्वारा सात स्वयंसेवी संस्थांमार्फत वस्ती पातळीवर विद्यार्थ्यांकरीता आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात ९७०० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. तथापि, संगणकयुक्त मोबाईल बस द्वारा प्रशिक्षण आयोजित करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने सदर संस्थांनी संगणकयुक्त मोबाईल बस पुणे महानगरपालिकेकडे परत जमा केलेल्या आहेत.

(२) पुणे महानगरपालिका प्रशासना मार्फत याबाबतची सर्वेकष माहिती घेतली असून संगणकयुक्त मोबाईल बसेस द्वारे पुन्हा प्रशिक्षण देणे करिता कार्यवाही सुरु आहे.

(३) पुणे महानगरपालिकेकडे असलेल्या संगणकयुक्त मोबाईल बस द्वारे स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षण आयोजित करणेकरीता प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीस प्रतिसाद न मिळाल्याने दिनांक १८.१.२०१५ रोजी फेर जाहिरात प्रसिध्द करणेत आली असून या जाहिरातीस अनुसरुन फक्त झेन्सॉर कंपनी, पुणे यांचा प्रस्ताव प्राप्त झाला. त्यामुळे दिनांक ५ मार्च, २०१५ रोजी पुन:श्च जाहिरात प्रसिध्द करणेत आली. या जाहिरातीमध्ये देण्यात आलेल्या विहीत मुदतीत कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नाही. त्यामुळे दिनांक १८.१.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन झेन्सॉर कंपनी द्वारा प्राप्त झालेल्या प्रस्तावास आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दिनांक २१.४.२०१५ अन्वये मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे दिनांक १६.४.२०१५ रोजी राष्ट्रीय लाईफ सेव्हिंग सोसायटी ऑफ इंडिया, पुणे या संस्थेद्वारे मोबाईल बस द्वारा संगणक प्रशिक्षण आयोजित करणेकरीता प्राप्त झालेला प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

(४) कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामधून एजंट व दलालांची हाकलपट्टी करण्याबाबत

(२) ८५२० (०८-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विकास कुभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामधून एजंट व दलालांची हाकलपट्टी करण्याचे आदेश राज्याचे परिवहन आयुक्त यांनी माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील एजंटना उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वाहन प्रतिनिधी म्हणून काम करण्याची परवानगी १९८७ साली दिली असल्याचे एजंटची अडवणूक करु नये अशी मागणी एजंटनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एजंटाच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. दिवाकर रावते (२०-०७-२०१५) :(१) होय.

(२) मा.उच्च न्यायालय, नागपूर यांनी रिट याचिका क्र. २०६५/१९८७ मध्ये दि. ०६.०६.२००२ रोजी दिलेल्या आदेशानुसार, एखादा व्यक्ती काही कारणास्तव वाहनाच्या कामानिमित्त परिवहन कार्यालयात येऊ शकत नसेल तर त्याच्यावतीने त्याचा प्रतिनिधी म्हणून त्यांच्या लेखी हमीसह उपस्थित राहून परिवहन कार्यालयात काम करु शकतो असे आदेश दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी येथील उद्योग घटकांना प्रोत्साहनासाठी अपात्र ठरविण्यात आल्याबाबत

(३) ८५४७ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामूहिक प्रोत्साहन योजना २००१ अंतर्गत विद्युत जोडणीस विलंब झाल्यामुळे इचलकरंजी येथील प्राईड इंडिया को-ऑप टेक्सपार्क मधील उद्योग घटकांना प्रोत्साहनासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योग घटक अडचणीत येवून बंद होण्याच्या परिस्थिती असल्यामुळे विद्युत घटकाने विशेष बाब म्हणून प्रोत्साहन देण्याची विनंती शासनास केली आहे व सदरील प्रस्ताव मंत्रीमंडळ उप समितीसमोर विचारार्थ प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेकडून जप्तीची कारवाई करण्यात येत असल्यामुळे सदरील निर्णय केव्हा पर्यंत होणे अपेक्षित आहे ?

श्री. सुभाष देसाई (१०-०६-२०१५) :(१) शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २००७ अन्वये सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ लागू करण्यात आली होती. या शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी सामूहिक प्रोत्साहन योजना २००१ अंतर्गत लाभ घ्यावयाच्या प्रस्तावांच्या सर्व अंतिम परिणामकारक टप्पे पुर्ण करण्याची मुदत दिनांक ३१ मार्च, २००८ होती. प्राईड इंडिया को-ऑप टेक्सपार्क इचलकरंजी मधील घटकांनी विद्युत जोडणी दिनांक ३१ मार्च, २००८ नंतर झालेली असल्याने ते सामूहिक प्रोत्साहन योजना २००१ अंतर्गत पात्र ठरत नाहीत.

(२) मंत्रिमंडळ उप समितीच्या विचारार्थ अशा आशयाचा प्रस्ताव प्रलंबित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे साजणी (ता.हातकणंगले) येथील ग्रामपंचायतीस महात्मा गांधी तंटामुक्ती पुरस्कार अंतर्गत प्राप्त झालेल्या रक्कमेचा नियमबाह्यारितीने केलेल्या विनियोगाबाबत.

(४) ८५५४ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साजणी (ता.हातकणंगले) येथील ग्रामपंचायतीस महात्मा गांधी तंटामुक्ती पुरस्कार अंतर्गत प्राप्त झालेल्या रक्कमेचा नियमबाह्यारितीने विनियोग करून गैरव्यवहार व अपहार केल्याची तक्रार ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख कोल्हापूर यांचेकडे माहे जुन, २०१३ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीवर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे सुध्दा खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यवाही न करण्याचे सर्वसाधरण करणे कोणती ?

श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

दिनांक १८/०६/२०१३ रोजी मौजे साजणी ता.हातकणंगले येथील ग्रामपंचायतीस महात्मा गांधी तंटामुक्ती पुरस्कार अंतर्गत प्राप्त झालेल्या रुपये पाच लाख रक्कमेच्या गैरव्यवहार व अपहार केल्याबाबतची चौकशी तात्काळ करणे व तत्कालीन अध्यक्ष व सरपंच यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेबाबतचा अर्ज जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख कोल्हापूर यांना श्री.बाळासाहेब शामराव पाटील, अध्यक्ष, तंटामुक्त समिती, साजणी सरपंच, उपसरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्य साजणी यांनी दिला होता.

(२) हे खरे नाही,

ग्रामपंचायत साजणीच्या ग्रामसभा दिनांक १५/०८/२०१२ रोजी ठराव क्र. २३/५ अन्वये दिनांक १४/०८/२००८ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचीनुसार सदर बक्षिसाची रक्कम खर्च करण्यात यावी व सदरचा खर्च नियमानुसार करण्यात यावा मात्र सध्या ग्रामपंचायतीकडे या निधीव्यतिरिक्त शिल्लक निधी नसल्याने व नव महाराष्ट्र सह. सुत गिरणीकडील ठोक अंशदान करार झाल्यानंतर अंदाजे १५ ते १६ लाख रक्कम प्राप्त होणार असल्याने सध्या बक्षिसाच्या रक्कमेतून ग्रामपंचायत दैनंदिन खर्च व अन्य विकास कामावर खर्च करण्यात यावा सदर खर्च केलेली रक्कम नव महाराष्ट्र सह. सुत गिरणीकडील रक्कम प्राप्त झाल्यानंतर महात्मा गांधी तंटामुक्ती योजनेच्या बक्षिस रक्कमेच्या खर्चाचे नियोजन करण्यात यावे असा ठराव पारीत करण्यात आला. सदर रक्कम दैनंदिन खर्चास वापरली असून त्या निधीचे नियमाप्रमाणे नियोजन न केल्याने तत्कालीन ग्रामसेवक श्री. एम.एस.कांबळे यांची खातेनिहाय चौकशीची कार्यवाही सुरु आहे. तसेच सरपंच सौ.शबनम फरास ह्या तक्रार होणे पुर्वी त्यांचा ग्रामपंचायत सदस्य पदाचा कार्यकाल पुर्ण झाल्याने व त्या सध्या कार्यकारिणीत नसल्याने त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ नगरपालिकेने नवीन पाणीपुरवठा योजना मंजूरीसाठी असलेल्या अटींची पूर्तता केली नसल्याबाबत

(५) ८५५६ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पाणीपुरवठा योजना मंजूरीसाठी प्रथम महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियांनाचे निकष १०० टक्के पूर्ण करण्याच्या शासनाच्या अटी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसावळ नगरपालिकेने पहिल्या टप्प्यातील सुरुवातीच्या अटींची देखील पूर्तता केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१४-०७-२०१५) :(१) होय.
(२), (३) व (४) महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत भुसावळ नगरपरिषदेचा सुधारणा कामांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानास दिनांक ३१.३.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा तसेच तद्नंतर या अभियांतर्गत नवीन कामांना मंजूरी न देण्याचा निर्णय, शासन निर्णय, दिनांक २३.१.२०१४ अन्वये घेण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात पर्यावरण विभागाने ना हरकत प्रमाणपत्र नाकारल्यानंतरही बांधकाम प्रकल्पांची कामे सुरु असल्याबाबत

(६) ८५५७ (०६-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात पर्यावरण विभागाने ना हरकत प्रमाणपत्र नाकारलेले १५० बांधकाम प्रकल्पांची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करुन ना हरकत प्रमाणपत्र नसणाऱ्या प्रकल्पांची कामे थांबवून त्यांच्या मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (१५-०६-२०१५) :(१) नाही.
(२) व (३) केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालय यांचेमार्फत गठीत राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती-३ ने ऑक्टोबर, २०१३ ते मार्च, २०१५ या कालावधीत सुमारे २२० प्रस्ताव पर्यावरण अनुमती संबंधित नियमांचे पालन होत आहे किंवा कसे याची शहनिशा पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत करण्यास्तव पर्यावरण विभागाकडे पाठविले. त्यानुसार विहित प्रक्रियेचे पालन करुन एकूण ८६ प्रकल्पांविरुध्द न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत ज्या शाळांनी प्रवेश दिले त्याचा परतावा अद्याप संबंधित शाळांना दिला नसल्याबाबत

(७) ८५५८ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत ज्या शाळांनी प्रवेश दिले त्यांना सन २००९ वर्षापासून शासनाकडून परतावा मिळण्यासाठी देयके सादर करुनही (सन २००९ ते २०१४) पर्यंत २५ टक्के विद्यार्थ्यांच्या फीचा परतावा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शाळांना परतावा तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) परताव्याच्या रकमेपैकी दिनांक १३ मार्च २०१५ च्या शासन निर्णयान्वये तसेच दिनांक २६ मार्च २०१५ च्या पत्रान्वये रुपये १९.५ कोटी इतका निधी २५ टक्के प्रवेशित विदयार्थ्यांच्या फी चा परतावा करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे.

राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील ११ महिन्यांच्या करारावर घेतलेल्या संगणक शिक्षकांना योग्य वेतन मिळण्याबाबत

(८) ८५६२ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या बूट मॉडेल तत्त्वावर राज्यभरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्याची योजना सन २००८ पासून सुरू केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आठ हजारापेक्षाही जास्त शिक्षक ५ वर्षापर्यंत ११ महिन्यांच्या कराराने विविध खासगी कंपन्यामार्फत नियुक्त करण्यात आले असून या संगणक शिक्षकांना शेतमजुरांपेक्षाही कमी वेतन देत असल्याची बाब महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक संघटनेच्या माध्यमातून माहे डिसेंबर २०१४ दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संगणक शिक्षकांना योग्य वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :(१) होय.
(२) हे खरे आहे.
(३) एजन्सी प्रतिनिधींबरोबर बैठका घेऊन संगणक निदेशकांना करारानुसार मानधन अदा करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या टप्पा ३ अंतर्गत किमान मानधनाबाबत करारामध्ये तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मूकबधिरांसाठी उच्च शिक्षण उपलब्ध करण्याबाबत

(९) ८५८४ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मूकबधिरांसाठी शासनामार्फत दहावीपर्यंतच शाळा चालविल्या जात असल्याने त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीची चौकशी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मूकबधिरांसाठी उच्च शिक्षण उपलब्ध करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना करणार आहे वा केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०५-०६-२०१५) :(१) हे खरे नाही, सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अपंगाकरीता इयत्ता १० वी पर्यंतच्या विशेष शाळा कार्यरत आहेत. तथापि, मूकबधिर विद्यालय, शंकरनगर, नागपूर व श्री.सदगुरु साईबाबा सेवा ट्रस्ट संचलित श्री.सी.आर.रंगनाथन निवासी कर्णबधिर विद्यालय, पुणे या विद्यालयात कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ११ वी, इयत्ता १२ वीचे उच्च माध्यमिक वर्ग सुरु असून यास शिक्षण विभागाने विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. अंध, अधुदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर अस्थिव्यंग, मतिमंद व मनोरुग्ण विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी नंतरचे महाविद्यालयीन शिक्षण सामान्य मुलांबरोबरच घेत आहे. तसेच व्यावसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे अभ्यासक्रमासाठी शिक्षवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी शिष्यवृत्तीकरीता मंजूर केलेला निधी विद्यार्थ्यांना वेळेत वितरीत न केल्याबाबत

(१०) ८५८५ (१०-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी सन २०१३-१४ दरम्यान शिष्यवृत्तीकरीता मंजूर केलेला निधी तत्कालीन नागपूर विभागीय प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्तांनी उचल केल्यानंतर संबंधित शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांना वेळेत वितरीत न केल्याने शासनास परत गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाद्वारे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयातील ३ साखर कारखान्यांची विक्री शासकीय मुल्यांकनाच्या पेक्षा कमी किंमतीत केल्याबाबत

(११) ८५८७ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील गत ३ वर्षात ३ साखर कारखान्यांची (शेतकरी, अंबा, कोंडेश्वर) विक्री शासकीय मुल्यांकना पेक्षा कमी किमतीत केली गेली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी आढळणा-या व्यक्तीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व शासकीय मूल्यांकनापेक्षा कमी किंमतीत कारखाना विकण्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०७-२०१५) :(१) अंशत खरे आहे. अंबादेवी सहकारी साखर कारखाना म., अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती व कोंडेश्वर सहकारी साखर कारखाना म.फुलबाग, जि.अमरावती या दोन्ही साखर कारखान्यांची विक्री मुल्यांकना पेक्षा कमी किंमतीत राज्य सहकारी बँकेने सरफेसी कायदयांतर्गत परस्पर केलेली आहे. तर वसंतदादा साखर संशोधन संस्था, मांजरी, पुणे यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार शेतकरी सहकारी साखर कारखाना म. देवगाव, जि. अमरावती या कारखान्याची यंत्रसामुग्री Shift away तत्वावर शरद सहकारी साखर मर्या. विहामांडवा, ता. पैठण, जि. औरंगाबाद यांना विक्री करण्यात आली आहे.
(२) राज्य सहकारी बँकेने सरफेसी कायदा, २००२ (Securitization & Reconstruction of financial Assets & Enforcement of Security interest Act, २००२) अंतर्गत कारखान्यांची विक्री केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन अन्यत्र हलविण्याबाबत

(१२) ८६२१ (०७-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील शासकीय मध्यवर्ती रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिन अन्यत्र हलवणार असल्याच्या हालचाली सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णांची अतिशय गैरसोय होईल याबाबत शासनाने कोणती उपापयोजना केली वा करण्यात येणार आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :(१) होय, शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा रुग्णालयात पीपीपी अंतर्गत खाजगी तत्वावर रेडिओडायग्नोस्टीक सुविधा पुरविण्यात येणार असल्याने या रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन उपजिल्हा रुग्णालय, शहापूर, जि.ठाणे येथे स्थानांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.
(२) पीपीपी अंतर्गत सी.टी.स्कॅन मशीनचा पुरवठा झाल्यानंतरच या रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन स्थानांतरीत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खरीप २०१४ मधील बाधीत शेतक-यांना अर्थसहाय करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आल्याबाबत रब्बी गावांकरिता अनुदान मंजुर करण्याबाबत

(१३) ८६४४ (०४-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरीप २०१४ मधील बाधीत शेतक-यांना अर्थसहाय करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आल्याबाबत रब्बी गावांकरिता अनुदान मंजुर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, यांना एक लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-०७-२०१५) :(१) होय.
(२) रब्बी हंगाम २०१४-१५ मधील बाधीत शेतकऱ्यांना अर्थसहाय करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये रु.३६४.२७ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मूल येथील (जि.चंद्रपूर) राजकीय पक्षाचे पदाधिकारी असलेल्या दोन कंत्राटदारांना चिचपल्ली येथील वनअधिका-यांनी गौण खनिजांचे अवैध उत्खनन करण्यास मज्जाव केल्याप्रकरणी त्यांची बदली करण्यासंदर्भात

(१४) ८६६३ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल येथील (जि.चंद्रपूर) राजकीय पक्षाचे पदाधिकारी असलेल्या दोन कंत्राटदारांना चिचपल्ली येथील वनअधिका-यांनी गौण खनिजांचे अवैध उत्खनन करण्यास मज्जाव केल्याप्रकरणी त्यांची बदली करण्यासंदर्भात मा. वन मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०६-२०१५) :(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील महात्मा ज्योतिबा फुले निवासी बालगृहामध्ये संस्थाचालकाने एका सुशिक्षित बेरोजगाराकडून दोन लाख ५० हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याबाबत

(१५) ८६६९ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील महात्मा ज्योतिबा फुले निवासी बालगृहामध्ये काळजीवाहू पदाकरिता संस्थाचालकाने एका सुशिक्षित बेरोजगाराकडून दोन लाख ५० हजार रुपये घेऊन फसवणूक केल्या प्रकरणी दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास स्थानिक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) होय.
(२) सदर प्रकरणी संदीप विरुटकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस स्टेशन भद्रावती येथे गु.र.क्र.२/२०१५, भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर प्रकरणात एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपींना जामीन मिळाला आहे. आरोपींकडून संस्थेतील कागदपत्रे, नियुक्तीपत्रे, बँकेची स्टेटमेंट व संस्थेतील कार्यालयातील साहित्य जप्त करण्यात आलेली आहेत. सदर प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पोंभुर्णा तालुक्याच्या (जि.चंद्रपूर) निर्मितीला १५ वर्षात कालावधी लोटूनही अद्यापही सुसज्ज बसस्थानकांची निर्मिती करण्यात आली नसल्याबाबत

(१६) ८६७७ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा तालुक्याच्या (जि.चंद्रपूर) निर्मितीला १५ वर्षाच्या कालावधी लोटूनही अद्यापही सुसज्ज बसस्थानकांची निर्मिती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी वांरवार संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदने देऊनही बसस्थानक बांधण्यात आलेले नाही, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, या ठिकाणी बसस्थानक बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१५) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) पोंभूर्णा येथे १०'x४०' आकाराचा प्रवासी निवारा आहे. सदर निवारा दुरुस्ती व नुतनीकरणाकरीता निविदा काढण्यात आलेल्या आहेत.

शासकीय जमीन उपलब्ध नसल्यामुळे खाजगी सोयी युक्त जागेचा शोध घेण्यात येत आहे.

जालना शहरात वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे १२ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाल्याबाबत

(१७) ८६८० (०८-०५-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरात वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे अनेक ठिकाणी घरावरुन वीज पुरवठा करणा-या तारा गेल्या असल्याने दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास पंतग उडवितांना शेख अमीर शेख अदिल हा १२ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामूळे जखमी झालेल्या मुलास तातडीने वैदयकिय व अर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे वा कारण्यात येत

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०६-२०१५) :(१) नाही, जालना शहरात १५ जानेवारी, २०१५ रोजी पतंग उडवताना शेख अमिर शेख आदिल हा १२ वर्षाचा मुलगा जखमी झाल्याची लेखी व तोंडी तक्रार संबंधीतंकडे प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे शहरातील हवा प्रदुषणकारी असून त्यातील धुलिकणांची मात्रा दिलेल्या मानांकापेक्षा जास्त असल्याबाबत

(१८) ८६८४ (०८-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील हवा प्रदुषणकारी असून त्यातील धुलिकणांची मात्रा दिलेल्या मानांकापेक्षा किती तरी पट अधिक असल्याने त्या प्रदुषणास कारणीभूत ठरणारे बिल्डर आणि रस्ते व अन्य स्थापत्यकामे करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय महानगरपालिकेने माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार आतापर्यंत किती बिल्डर व ठेकेदारांवर कारवाई केली आहे, त्यांच्याकडून किती दंडात्मक वसूली करण्यात आली आहे, बिल्डर व ठेकेदारांनी दंडात्मक रक्कम भरली नाही त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :(१) ठाणे महानगरपालिकेच्या महासभेद्वारे मंजूर प्रदुषण नियंत्रण नियमावली अन्वये ठाणे शहरातील धूळीच्या प्रदुषणास कारणीभूत ठरणारे बिल्डर आणि रस्ते व अन्य स्थापत्य कामे करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय ठाणे महानगरपालिकेने सन २०११-१२ मध्ये घेतलेला आहे.

(२) या निर्णयानुसार आतापर्यंत सुमारे १२६५ व्यावसायिक/ठेकेदार/विकासक/कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे रुपये ३०,००,९९४/- रक्कम वसुल करण्यात आली आहे. पैकी १७ विकासकांनी महानगरपालिकेच्या दंडात्मक नोटीसीला प्रतिसाद न दिल्याने त्यांच्याविरुध्द दंडात्मक वसुली संदर्भात सुनावणीची कारवाई प्रस्तावित केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे विमानतळ पोलिस ठाण्यात नियुक्तीस असलेल्या पोलिस उपनिरिक्षकाने महिलेला लग्नाचे अमिष दाखवून बलात्कार केल्याबाबत

(१९) ८६८७ (०८-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विमानतळ पोलिस ठाण्यात नियुक्तीस असलेल्या पोलिस उपनिरिक्षकाने पतीपासून विभक्त राहात असलेल्या महिलेला लग्नाचे अमिष दाखवून बलात्कार केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :(१) व (२) होय, सदर प्रकरणी फिर्यादीवरुन विमानतळ पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ३०२/२०१४ अन्वये भा.दं.वि. कलम ३७६ (२) क, ३२३, ४१७ अन्वये दिनांक २७.१२.२०१४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी पोलीस उप निरीक्षक याला न्यायालयाने दि. ०९.०३.२०१५ रोजी अटकपूर्व जामिन मंजुर केला आहे. सदर आरोपी पोलिस उप निरीक्षक यास दिनांक १०.०४.२०१५ रोजी सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वारुळवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) ग्रामपंचायतीच्या तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीत बेकायदेशीर कामे केल्याबाबत

(२०) ८७१९ (०८-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर तालुक्यातील वारुळवाडी (जि.पुणे) ग्रामपंचायतीच्या तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.कुवरलाल घासले यांनी ग्रामपंचायतीत बेकायदेशीर कामे केल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी जिल्हा परिषद प्रशासनाने व शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर कामे करणाऱ्या तत्कालीन ग्रामविकास अधिका-यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२३-०७-२०१५) :(१) होय.

(२) व (३) होय. जिल्हा परिषद प्रशासनाने केलेल्या चौकशीत ग्रामपंचायत वारुळवाडीचे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी प्रथम दर्शनी दोषी आढळल्याने त्यांना दिनांक १९.१.२०१५ रोजी सेवेतून निलंबीत करण्यात आले असून संबंधितांची खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लघुसिंचन प्रकल्पाबाबत.

(२१) ८७२२ (०८-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १३, रत्नागिरी जिल्ह्यातील २२ व रायगड जिल्ह्यात १३ अशा एकूण ४८ लघुसिंचन प्रकल्पाला शासनाने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मंजुरी दिलेल्या लघुसिंचन प्रकल्पाचे मान्यता शासनाने रद्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व कोकणात पडणा-या १५० इंच पावसाचे पाणी नद्यांच्या माध्यमांतून समुद्रात वाहून जाऊ नये यासाठी २ डोंगरांच्यामध्ये छोटी धरणे बांधून पाणी अडविण्याबाबत कोणती पर्यायी योजना शासनाने तयार केली आहे,
(३) अद्याप पावसाचे पाणी वाहून वाया जाऊ नये यासाठी योजना तयार करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :(१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत ठाणे जिल्ह्यातील २, रायगड जिल्ह्यतील ७, रत्नागिरी जिल्ह्यातील ९ व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १ अशा एकूण १९ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली अहे.
(२) सदर योजनांना पाणी उपलब्ध प्रमाणपत्र नसल्यामुळे प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे पत्रान्वये रद्द रकण्यात आल्या आहेत. कोकणात पडणाऱ्या १५० इंच पावसाचे पाणी नद्यांच्या माध्यमातून वाहून जाऊ नये म्हणून अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे या मंडळांतर्गत लघु पाटबंधारे योजना, पाझर तलाव, साठवण तलाव, सिमेंट नाला बांध अशी कामे करण्यात येतात. सद्य:स्थितीत १७ योजनांची कामे पूर्ण असून त्यामुळे अंदाजे १७११ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. १२० योजना प्रगतीपथावर असून त्यामुळे अंदाजे १६२३० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल व प्रस्तावित ११५ योजनापैकी काही योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. कोकणातील पाणी वाया जाऊ नये यासाठी यांचा उपयोग होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे काजिर्ण (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे सन २००० मध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या काजिर्णे प्रकल्पाबाबत

(२२) ८७५० (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काजिर्ण (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे सन २००० मध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या काजिर्णे प्रकल्पात सुमारे १४ वर्षाचा कालावधी लोटूनही पाणी साठा केला जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर लघु पाटबंधा-यांत पाणीसाठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१५) :(१) होय.
(२) विमोचकाच्या कामातील तांत्रिक अडचणींमुळे पाणीसाठा करणे शक्य झालेले नाही.
(३) सदर लपा तलाव हा साठवण तालावामध्ये रुपांतरित करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सामानगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे क वर्ग पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत

(२३) ८७७५ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामानगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे "क" वर्ग पर्यटन स्थळाचा विकास करण्याची तसेच शिवकालीन कलानंदीगड पर्यटन क्षेत्रस्थळाचा विकास करण्यासाठी ५ कोटी निधीची तरतूद करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :(१) सामानगडासाठी रु. १ कोटींची व कलानंदी गडांच्या पर्यटन विकासासाठी रु.५ कोटीची मागणी दि.१६/१/२०१५ च्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे.
(२) सामानगड येथील पर्यटनदृष्ट्या विकास कामांचा प्रस्ताव यापुर्वीही प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव राज्य पर्यटन समितीच्या विचारार्थ सादर केला होता. मात्र तो मान्य झाला नाही. आता दि.१६/१/२०१५ च्या पत्रांबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर ते राज्य पर्यटन समितीच्या विचारार्थ सादर करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

घाटकोपर मधील जागृतीनगर मेट्रो स्थानकाचे बांधकाम घाईघाईने करुन एमएमआरडीएने कसलाही विचार न करता जलवाहिनीवरच या मेट्रो स्थानकाचे बांधकाम केल्याबाबत

(२४) ८७९५ (०७-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर मधील जागृतीनगर मेट्रो स्थानकाचे बांधकाम घाईघाईने करुन एमएमआरडीएने कसलाही विचार न करता जलवाहिनीवरच या मेट्रो स्थानकाचे बांधकाम केल्याने बांधकामातून पाण्याचे झारे वाहू लागल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी गळतीमुळे हे मेट्रो स्थानक खचण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या स्थानकाची एमएमआरडीने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व त्यानुसार यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :(१) सदर जलवाहिनी जागृती नगर मेट्रो स्थानकाच्या खाली नसून अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याच्या खाली आहे.

(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर स्थानकाची पाहणी करण्यात आली आहे. पाणी गळती होत असल्याने प्राधिकरणाकडून त्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले असता महानगरपलिकेच्या संबंधित विभागाने जलवाहिनीची पाहणी केली आहे. घाटकोपरमधील जागृतीनगर मेट्रो स्थानकाच्या बांधकामादरम्यान येणाऱ्या सर्व जलवाहिन्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थलांतरीत करण्यात आल्या आहेत. तसेच मेट्रो स्थानकाच्या बांधकामाखालील अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यामधून जाणाऱ्या १५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी गळती झाल्याने सदर जलवाहिनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून खंडीत करण्यात आली आहे. सदर जलवाहिनीची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गळती पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी असलेल्या नदी प्रदूषण संरक्षण धोरण शिथिल करण्याचा घेतलेला निर्णय

(२५) ८८१३ (०६-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी राज्य शासनाने सन २००९ मध्ये नदी प्रदूषण व संरक्षण धोरण आखून त्यात सुधारणा करुन नदी पात्राच्या दोन्ही बाजूस ३ कि.मी.च्या आत उद्योग उभारण्यास बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीपात्राच्या दोन्ही बाजूस २ कि.मी. अंतरात उद्योग उभारणीवर असलेला निर्बंध उठवण्याच्या मा. मुख्यमंत्री कार्यालयाने तयार केलेल्या प्रस्तावास शासनाच्या पर्यावरण विभागाने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नदी प्रदूषण संरक्षण धोरण शिथिल करण्याचा निर्णय दिनांक २०जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०१-०७-२०१५) :(१) उदयोगापसून नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी शासनाने दिनांक १५/०७/२००० व सुधारित १३/०७/२००९ च्या शासन निर्णयाद्वारे नदी काठावरील नियमन करण्याचे धोरण केले होते.

(२) व (३) दिनांक १३/०७/२००९ चे धोरण दिनांक २०/०१/२०१५ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार रद्द केले आहेत.

(४) दिनांक १३/०७/२००९ चे धोरण हे पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या तरतुदीनुसार राज्य शासनास प्राप्त अधिकारानुसार नसल्याने शासनाने धोरण रद्द केले. सद्यस्थितीत जलप्रदुषण कायद्यानुसार उद्योगांवर कडक नियंत्रण ठेवण्यात येत असुन सांडपाणी प्रकियेसाठी कडक उपाययोजना उद्योगांकडून मंडळाद्वारे करुन घेण्यात येतात.

वरठी (जि.भंडारा) बस स्थानकाचे विस्तारीकरण व विकास कार्य करून सुस्थापित करण्याबाबत

(२६) ८८२५ (०४-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील वरठी गाव येथून रेल्वेमार्ग गेला असून येथे शाळा, कॉलेजेस आहेत, दररोज हजारोंच्या संख्येने नागरीक प्रवास करतात, परंतु तेथे वेळेवर बसची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना व नागरिकांना अनेक सुविधांचा सामना करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ५० वर्षांपासून वरठी बस स्थानकाला हक्कांची जागा नसून कित्येक वर्षापासून रेल्वेची जागा वापरात असलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने निर्माण होणा-या समस्येंबाबत कोणतीही गंभीर दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील नागरिकांचे बस स्थानकाचे विस्तारीकरण व विकासकार्य करून सुस्थापित बस स्थानकाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीवर शासन कार्यवाही करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०२-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) भंडारा जिल्हयातील वरठी हे गाव भंडारा बसस्थानकापासून १२.७ अंतरावर असून सद्यस्थितीत या ठिकाणी रेल्वे खात्याकडून भाडेतत्वावर घेतलेल्या ३००० चौ.फुट जागेमध्ये १०X१० चौ. फुटाचा प्रवासी निवारा आहे.

वरठी येथे बसस्थानकाकरीता ०.६४ हेक्टर जागेची मागणी सन २००५ मध्ये रा.प. महामंडळाद्वारे करण्यात आली असता सदर जागा झुडपी जंगल व गवताची असल्याने वन संवर्धन अधिनियम १९८० नुसार देता येत नसल्याचे महामंडळास कळविले होते.

भंडारा ते वरठी करीता सकाळी ६.०० ते रात्री २२.०० वा. पर्यंत प्रवासी व शालेय विद्यार्थ्यांकरीता जाणाऱ्या व येणाऱ्या अशा एकूण ७३ फेऱ्या सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्यात आधारकार्ड सक्तीच्या नावाखाली
ग्रामीण भागात लुट करण्यात येत असल्याबाबत

(२७) ८८३२ (०६-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात आधारकार्ड मोहिमेला गती देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून गेल्या वर्षी पासून या नोंदणीला सुरुवात करण्यात आली मात्र संबंधितांकडून नोंदणी करण्यासाठी ८० ते १०० रुपयाची लुट करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात ये आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) (२) (३) व (४) भंडारा तालुक्यातील एका व्हीबाबत तक्रार ई.एल. प्राप्त झाली होती त्याबाबत तपासणी करण्यात येऊन, संबंधित आधार केंद्र बंद करण्यात आले आहे.

राजीव नगर एस.आर.ए. को.ऑप हाऊसिंग सो.लि. (मुंबई) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत
रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत

(२८) ८८३९ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव नगर एस.आर.ए. को.ऑप हाऊसिंग सो.लि. (हाजीअली, मुंबई) च्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व स्थानिक रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१०-०७-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सादर केलेल्या अहवालानुसार राजीव नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपटपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट असलेल्या १३२ पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावली - १९९१ कलम ३३(१०) च्या तरतूदीनुसर सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या

आहेत. त्यामुळे या प्रकरणी कार्यवाहीची आवश्यकता दिसून येत नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारी संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यांना दिनांक २२.४.२०१५ च्या पत्रान्वये याबाबतची वस्तुस्थिती कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

व्हि.पी. नगर रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. वरळी, मुंबई या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामात दिरंगाई व फसवणूक करणा-या विकासकावर कारवाई होण्याबाबत

(२९) ८८५० (०८-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्हि.पी. नगर रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. वरळी, मुंबई या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामात दिरंगाई व फसवणूक करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांचे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे, चौकशीत काय आढळून आले व पुनर्वसन योजनेच्या कामात दिरंगाई व स्थानिकांची फसवणूक करणाऱ्या विकासकाविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१०-०७-२०१५) :(१) या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीचे पत्र शासनास तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दिनांक १३.२.२०१५ च्या पत्रान्वये मा.स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रार अर्जाबाबत वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत प्राप्त तक्रारीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे दिनांक १३.२.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदरहू सुनावणीमध्ये योजनेच्या विकासकास पुनर्वसन इमारतीच्या बांधकामास झालेल्या विलंबाबाबत रुपये १० लाख इतका दंड आकारण्यात आला असून, दंडाची रक्कम विकासकाने दिनांक ३१.३.२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा केली आहे. तसेच थकीत भाडे, संक्रमण शिबीराचे थकीत वीज देयके अदा केल्याचे विकासकाने दिनांक २६.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सुगाव, बर्दापूर (जि.बीड) येथे एका ऊसतोड मजूर तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याबाबत

(३०) ८८५५ (०६-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुगाव, बर्दापूर (जि.बीड) येथे एका ऊसतोड मजूर तरुणीवर तिच्या भावासमोर दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी सामूहिक बलात्कार करण्यात आला असून याप्रकरणी बर्दापूर पोलिसांनी काही जणांना अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुकादम महादेव भागवत याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून त्यांच्यावर यापूर्वी ही पोलिसात गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :(१), (२) व (३) होय, सदर प्रकरणी फिर्यादीवरुन बर्दापूर पोलीस ठाणे येथे एकूण निष्पन्न ७ आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंद क्रमांक ०६/२०१५ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७६(ड), ३४२, ३२३, ५०६ त्याचप्रमाणे अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१)११(१२), ३(२)(५) तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम सन २०१२ कलम ४,१८ अन्वये दिनांक १८.१.२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपींच्या विरोधात न्यायालयात के.क्र. ०८/२०१५ दि. २१.२.२०१५ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

आरोपी मुकादम महादेव भागवत व इतर ५ यांच्याविरोधात यापुर्वी बर्दापूर पोलीस ठाणे येथे फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्रमांक २४/२००९, भा.दं.वि. कलम १४७, १४८, १४९, ३२६, ३३६, ३२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे, सदर आरोपीतांच्या विरोधात न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले असून त्याचे आर.सी.सी.क्र. ४३०/२००९ असा आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील पक्षाचे उदयान बर्ड पार्क तयार करण्याचा प्रस्तावाबाबत

(३१) ८८७६ (०४-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पक्ष्यांना पिंजऱ्यात कैद न करता उद्यानात मोकळे सोडून पर्यटकांना त्यांच्या किलबिलाटाचा आनंद घेवू देण्यांचे उद्दिष्ट ठेवून मुंबईत पक्ष्यांचे उद्यान (बर्ड पार्क) तयार करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प होणार असून गेल्या ४ वर्षांपासून ह्या प्रकल्पाचे नियोजन रखडले असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत पक्ष्यांचे स्वतंत्र उद्यान उभारण्याचा मास्टर प्लॅन तयार करणे आणि उद्यान प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याची प्रक्रिया उद्याप पूर्ण झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यटकांना आनंद देणाऱ्या या प्रकल्पांची उभारणी केव्हा होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१), (२) व (३) हे खरे नाही. पवई येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान (सुमारे ३० एकर क्षेत्र) या क्षेत्राची पक्षी उद्यान (बर्ड पार्क) निर्मितीकरिता निवड केली आहे. सदर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्षसंपदा असून सदरचे क्षेत्र हे नव्याने पक्षी उद्यान (बर्ड पार्क) विकसित करण्याकरिता योग्य आहे. सदर पक्षी उद्यान विकसित करण्याकरिता बृहत् आराखडा तयार करण्यासाठी माहे जानेवारी २०१४ मध्ये Expression of Interest प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन सदर पक्षी उद्यान विकसित करण्याकरिता बृहत् आराखडा तयार करण्यासाठी आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मेसर्स युनिव्हर्सल ऑर्ग्यानिक्स प्रा.लि., मुंबई या सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर बृहत् आराखडा तयार करुन त्यास केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर पक्षी उद्यान प्रकल्पाची उभारणी हाती घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ४५ अभयारण्ये व वन क्षेत्राच्या पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात घट करण्याचा प्रस्ताव

(३२) ८९०० (०६-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जवळपास ४५ अभयारण्ये व वन क्षेत्राच्या पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात घट करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मुंबईसह कोणत्या अभयारण्यांचा व वन क्षेत्रांचा यामध्ये समावेश आहे व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे काय याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०७-२०१५) :(१) राज्यातील राष्ट्रीय उद्यान/अभयारण्याचे भोवती पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र निश्चित झालेले नसल्याने ते कमी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(२) राज्यातील मुंबईजवळील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासह ५३ संरक्षित क्षेत्रांपैकी (राष्ट्रीय उद्यान/अभयारण्य) ३६ संरक्षित क्षेत्रांभोवती पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र निश्चित करण्याचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर केलेले आहेत.

(३) केंद्र शासनाला सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प (१ राष्ट्रीय उद्यान व ४ अभयारण्य) वगळता केंद्र शासनाचे इतर कोणत्याही संरक्षित क्षेत्राचे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची प्राथमिक अधिसूचना अद्याप जारी केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यात गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याबाबत

(३३) ८९०६ (०६-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यात खून, जबरी चोरी-घरफोडी, विद्यार्थ्यांना मारहाण, सोनसाखळी चोरी, उशिरापर्यंत चालू राहणारे अवैध धंदे, बलात्कार आदि गुन्ह्यांमध्ये सन २०१४ मध्ये वाढ झाली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१) जळगाव जिल्ह्यात सन २०१३ च्या तुलनेत सन २०१४ मध्ये खुनाच्या गुन्ह्यात ७ ने, जबरी चोरीच्या गुन्ह्यात १९ व चोरी गुन्ह्यात २३ ने वाढ झाली आहे. तथापि बलात्कार सदरात ८ ने, सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात ४ ने, घरफोडी गुन्ह्यात ६२ ने, मटका जुगाराच्या गुन्ह्यात ९७ ने व अवैध दारु गुन्ह्यात ८४ ने घट झाली आहे.
(२) अवैध सट्टा/पत्ता जुगार धंदे व अवैध दारु व्यवसायात सक्रिय राहणा-या गुन्हेगारांविरुध्द सतत केसेस करुन आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या असून अवैध धंदे नेस्तनाबूत करणेसाठी विशेष मोहिम राबविण्यात आलेली आहे. यापुढेही अवैध सट्टा/जुगार, पत्ता जुगार व दारु धंदे सुरु होणार नाहीत याबाबत संपूर्ण दक्षता घेतली जात आहे.

वाढते गुन्हे व गुन्हेगारी नियंत्रणात रहावी म्हणून जिल्हा घटकात सक्तीची दरोडा प्रतिबंधक गस्त, रात्रगस्तसह कोम्बिंग नकाबंदी प्रभावीपणे राबविली जात आहे. रहदारीचे मार्ग व चौकांवर पेट्रोलींग कामी बिट मार्शल व ईगल पेट्रोलींगच्या कर्मचा-यांना कार्यरत करण्यात आलेले आहे.

पोलीस ठाणे अभिलेखावरील सर्व निगराणी बदमाश, माहीत असलेले गुन्हेगार व संशयीतांची नियमीत तपासणी करण्यात येत असून आवश्यकतेनुसार क्रि.प्रो.को.क. १५१(१) सह १०९, ११० नुसार व मु.पो.का.क १२२, १२४, ५५/५७ तसेच एम.पी.डी.अे. नुसार प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

मानव विकास कार्यक्रमांतर्गत माता व बालमृत्यू रोखण्यासाठी "जननी सुरक्षा योजनेबाबत"

(३४) ८९११ (०७-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानव विकास कार्यक्रमांतर्गत माता व बालमृत्यू रोखण्यासाठी ''जननी सुरक्षा योजना'' सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २० जानेवारी, २०१५ च्या पूर्वी अवघ्या नऊ महिन्यात जळगांव जिल्ह्यात २६ माता व ७७ नवजात शिशूंचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) :(१) केंद्र शासनामार्फत माता व बालमृत्यू रोखण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जननी सुरक्षा योजना सुरु करण्यात आली असून यामार्फत विविध योजना राबविल्या जातात.
(२) होय, हे खरे आहे.

जळगांव जिल्ह्यात विविध वैद्यकीय कारणास्तव मातामृत्यू झालेले आहेत त्या मातामृत्यूची कारणे-प्रसुतीपक्षात रक्तस्त्राव, एक्लामशिया, अमेनिया व पिआयएच अशी आहेत. तसेच नवजात शिशु यांच्या मृत्यूचे प्रमुख कारणे अस्फक्झीया, कमी वजनाची बालके, अपुऱ्या दिवसाची बालके इत्यादी आहेत.
(३) सदर मातामृत्यू व नवजात शिशू मृत्यूबाबत जिल्हा स्तरावर असलेल्या समितीमार्फत अन्वेषण केले आहे. सदर मृत्यू हे विविध वैद्यकिय कारणास्तव झाले असल्याने याबाबत कोणीही दोषी आढळुन न आल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

रायगडच्या पायथ्याशी वसलेल्या पाचाड येथे असलेली पोलिस चौकी बंद असल्याबाबत

(३५) ८९१६ (०७-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगडच्या किल्याच्या पायथ्याशी वसलेल्या पाचाड येथे असलेली पोलिस चौकी गेल्या दोन वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलिस चौकी पुन्हा नव्याने सुरु करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस चौकी सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :(१), (२) व (३) रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली पाचाड पोलीस चौकी नादुरुस्त झाल्याने काही काळ बंद होती. सदर इमारतीची दुरुस्ती/डागडुजी करुन पाचाड पोलीस चौकशी पुन्हा दि.४.४.२०१५ रोजीपासून नव्याने सुरु करण्यात आली असून सद्य:स्थितीमध्ये पोलीस चौकीचे नियमित व दैनंदिन कामकाज चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात राबविण्यात येत असलेल्या केंद्र सरकार पुरस्कृत आय.सी.टी. योजनांबाबत आलेल्या तक्रारी

(३६) ८९२२ (०९-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र सरकार पुरस्कृत आय.सी.टी. योजना सन २००८ पासून शालेय विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्यासाठी कार्यरत असून सदर योजना शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहेत व त्याचा ठेका खाजगी कंपनीला दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर योजना राबवत असताना किती शिक्षक व कर्मचारी कार्यरत आहेत व त्यांची भरती कोणत्या प्राधिकरणाकडून होते,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी खाजगी कंपन्यांनी शासनाच्या सर्व कायदेशीर बाबींचे उल्लंघन केल्याच्या तक्रारी शासनास अनेक शिक्षकांनी व शिक्षक संघटनांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :(१) होय.
(२) योजनेच्या अंमलबजावणीसाठी निश्चित केलेल्या एजन्सीमार्फत संगणक निदेशकांची नियुक्ती केली जाते. एप्रिल २०१५ मध्ये ७०५८ संगणक निर्देशक कार्यरत आहेत.
(३) अंशत: खरे आहे.
(४) एजन्सी प्रतिनिधींबरोबर बैठका घेऊन संगणक निदेशकांना प्रलंबित मानधन अदा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच टप्पा ३ च्या करारामध्ये किमान माधनाबाबत स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नव्या पार्किंग धोरणानुसार घरासमोर पार्किंग न केल्यास वाहन मालकास दंड आकारण्याचा घेतलेला निर्णय

(३७) ८९५२ (०४-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्या पार्किंग धोरणानुसार घरासमोर पार्किंग न केल्यास वाहन मालकास दंड आकारण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने घेतल्याने अनेक नागरीकांमध्ये असंतोष पसरलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या नागरिकांना घरासमोर वाहन उभे करण्यास जागा नाही तसेच ज्या इमारतींमध्ये पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही त्यांना दंड न आकारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या विकास कामासाठी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ११ हजार ५१ कोटीची तरतूद केल्याबाबत

(३८) ९००५ (०६-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या विकास कामासाठी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ११ हजार ५१ कोटीची तरतूद केली असतांनाही माहे डिसेंबर, २०१४ अखेर केवळ २२ टक्के रक्कम खर्च केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार पूर्णक्षमतेने निधी खर्च न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) सन २०१४-१५ च्या भांडवली खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाशी तुलना करता प्रत्यक्ष भांडवली खर्च कमी झाला आहे हे खरे आहे. सदर २०१४-१५ च्या मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाजाचे (बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प वगळून) एकूण आकारमान रु.३११७८,१८ कोटी एवढे असून त्यापैकी भांडवली अर्थसंकल्पाचे आकारमान रु.११००३.६९ कोटी एवढे होते. दि. ३१.१२.२०१४ पर्यंत रु. २८२०.५१ कोटी एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला असून तो सन २०१४-१५ च्या भांडवली खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाशी तुलना करता तो २५.६३ टक्के एवढा आहे. सन २०१४-१५ चे भांडवली खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु.७३४८.०८ कोटी इतके सुधारित करण्यात आले असून, दि.३१.०३.२०१५ पर्यंत रु.५३३९.४६

कोटी (ताळमेळासापेक्षा) एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला असून तो २०१४-१५ च्या सुधारित अंदाजाच्या ७२.६६ टक्के एवढा आहे.

(२), (३) व (४) महापालिकेच्या अर्थसंकल्पात विविध भांडवली कामांसाठी मोठ्या प्रमाणावर तरतुदी करण्यात येतात. हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एक वर्ष व कामांच्या बाबतीत विशेषत: रस्ते, पर्यन्य जलवाहिन्या, पूल तसेच जल अभियंता खात्याशी संबंधीत मायक्रो टनेलींग काम सुरु करण्यापूर्वी वन खाते, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरीटी (MCZMA), रेल्वे वाहतूक पोलीस इत्यादी विविध बाह्य प्राधीकरणांच्या आवश्यक असलेल्या मंजुऱ्या/ना हरकत मिळविण्यास वेळ लागतो. त्यामुळे संबंधीत आर्थिक वर्षातील तरतुदींच्या पूर्ण विनियोग होऊ शकत नाही. काही प्रकल्प कामांच्या बाबतीत वापरावयाचे तंत्रज्ञान तांत्रीक सल्लागार समितीकडून अंतिम करुन घेणे आवश्यक असते. मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली कामे मनपाच्या हद्दीमध्ये पार पाडावयाची असतात. तसेच ही कामे दाट लोकवस्तीच्या भागात त्याचप्रमाणे खूप रहदारीच्या रस्त्यांवर आणि नाल्यांच्या काठावर झोपड्यांनी व्यापलेल्या ठिकाणी तसेच अतिक्रमणयुक्त ठिकाणी करावयाची असतात. त्यामुळे प्रत्यक्ष काम करताना अनंत अडचणी येतात व यावर मात करुन कामे पार पाडताना वेळेचे नियोजन राखता येणे कठीण जाते.

मुंबई व उपनगरात म्हाडाच्या मालकीचे सुमारे १९ ठिकाणी
मोकळे भूखंडावर म्हाडाने पुनर्विकास करण्याबाबत

(३९) ९०४१ (०७-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरात म्हाडाच्या मालकीचे सुमारे १९ ठिकाणी मोकळे भूखंडावर म्हाडाने पुनर्विकास केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर भूखंडाचा पुनर्विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. प्रकाश मेहता (०२-०७-२०१५) :(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे एकूण १०४ अभिन्यास असून म्हाडाच्या काही मोकळ्या भूखंडावर यापूर्वीच म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात आलेल्या आहेत. वेगवेगळया कारणांनी शिल्लक भूखंडावर प्राधान्याने गृहनिर्माण योजना राबविण्याची शक्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्या व्यतिरिक्त जुन्या वसाहतींचा पुनर्विकास, संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास इ.विविध प्रकारे जास्तीत जास्त गृहनिर्माण करण्याकरीता प्रयत्न सुरु असून अनेक योजना प्रगतीपथावर आहेत.

वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधून मिळण्याबाबत

(४०) ९०४४ (०६-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधून मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांना केलेल्या मागणीच्या अनुषंगाने उपसचिव, पर्यटन यांनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या पत्रान्वये अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधण्यासाठीचा अहवाल जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मागितला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :(१) होय,

(२) व (३) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालानुसार अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांना वसई किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधणेबाबतच्या स्थळाच्या जागेच्या मालकीसह सविस्तर प्रस्ताव व अंदाजपत्रक सादर करण्याबाबत तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई व संचालक, पुरातत्व विभाग, मुंबई यांना सदर कामाबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नवी मुंबई यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंडळ कार्यालय यांना प्राथमिक पाहणी अहवाल सादर केला असून सदरचे काम वैशिष्ट्यपूर्ण असल्याने तज्ञ सल्लागाराची नेमणूक करुन मेरीटाईम बोर्ड, पुरातत्व विभाग, सागरी नियंत्रण कक्ष व पर्यावरण विभाग यांचेकडून स्कायवॉक बाबतचा सुसाध्यता अहवाल तयार करावा लागणार आहे. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नवी मुंबई यांना अद्यापि मेरीटाईम बोर्ड, पुरातत्व विभाग, सागरी नियंत्रण कक्ष यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला नाही.

तारापूर एम.आय.डी.सी.अंतर्गत सांडपाणी निर्मुलन केंद्र उभारणीबाबत

(४१) ९०४८ (०६-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर एमआयडीसीमधील एस ३० या भूखंडावर तारापूर एन्व्हार्यन्मेंट प्रोटेक्शन सोसायटी TEPS ५० दशलक्ष लीटर क्षमतेचा प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (CETP) उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वतीने घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सुनावणीचे वेळी स्थानिकांनी स्वतः बहुसंख्येने उपस्थित राहून त्याचप्रमाणे सुचना व हरकती नोंदविण्याकरिता, नवापूर, नांदगाव, मुरंबे, कुळवली, बोईसर इ. गावांचे सरपंच/उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नागरीक तसेच विविध राजकीय पक्षाचे स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी,बोईसर स्वतः उपस्थित राहून यासंबंधी तीव्र असंतोष व्यक्त करून तसेच याबाबत लेखी निवेदनही संबंधित अधिका-यांकडे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्यांचे स्वरूप काय आहे व त्यावर शासनाने कोणते निर्णय घेतले वा घेण्यात येत आहेत,

(४) असल्यास, प्रस्तावित सांडपाणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) जनसुनावणीकरीता उपस्थित असलेल्यांपैकी काही नागरिकांनी या प्रकल्पाबात असंतोष व्यक्त केला. तथापि, तारापूर औद्योगिक वसाहतीमधील अतिरिक्त सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता नवीन सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारुन ते व्यवस्थितपणे चालविणे गरजेचे असल्याचेही मत काही नागरिकांनी जनसुनावणी दरम्यान व्यक्त केले.

सदर प्रकल्पाच्या संपन्न झालेल्या जनसुनावणीच्या इतिवृत्तात नमुद केलेली मते, विचार,निवेदने तसेच प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल इत्यादी बाबींचा विचार करुन पर्यावरण आघात मुल्यांकन समिती, पर्यावरण विभाग यांचेमार्फत दिनांक २४/०३/२०१५ रोजी सदर प्रकल्पास पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती प्रदान करण्यांत आली आहे.

(४) सामाईक सांडपाणी प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचे व पायाभरणीचे काम तसेच इतर बाबींची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

"महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियान" राबविण्याबाबत

(४२) ९०५२ (०६-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशस/१४०७/३६०/प्र.क्र.२११/ नवि-२ दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये राज्यातील "ड" वर्ग महानगरपालिका यांच्या अग्नीशमन सेवेतील तुट भरुन काढण्यासाठी व राज्यातील अग्नीशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टिने "महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियान" राबविण्यात शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) वसई-विरार शहर महानगरपालिका २००९ मध्ये स्थापन झालेली असून पूर्वीच्या वसई-विरार, नवघर-माणिकपूर व नालासोपारा या पूर्वीच्या चार नगरपालिकांमध्ये अग्नीशामक विमोचक (फायरमन) १२ पदे, वाहन यंत्रचालक (ड्रायव्हर कम ऑपरेटर) १४ पदे अशी अग्नीशमन कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून त्यास नगरविकास विभागाने त्यांचेकडील शासन निर्णय क्र.वनपा २००९/१०६९/प्र.क्र.१३९/०९/नवि-२० दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्र. अशस/१४०७/३६०/प्रक.२११/नवि-२, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या व क्षेत्रफळाला अनुलक्षुन ७ अग्नीशमन केंद्र व ७ वाहने मंजूरीसाठी पात्र असून, सदरहू शासन निर्णयानुसार अग्नीशमन विमोचक २१, अग्नीशमन विमोचक १४७, वाहन यंत्रचालक ४२ अशी एकूण ७ अग्नीशमन केंद्रासाठी २२४ कर्मचारी वर्ग उपलब्ध होणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) नुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेने दिनांक ६ जून, २०११ रोजीच्या सर्व साधारण सभेत ठराव क्र. ५ नुसार या २२४ पदनिर्मितीस मान्यता देऊन शासनाकडे तसेच संचालक महाराष्ट्र अग्नीशमन व आणीबाणी सेवा तथा अग्नीशमन सल्लागार यांनी शासनाकडे दिनांक २७ जून, २०११ रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्नीशमन विभागासाठी सदरहू २२४ पदे मंजूर करण्याच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागासाठी विविध संवर्गात १९८ पदे नव्याने मंजूर केली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसई तालुक्यातील (जि. पालघर) पेल्हार येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमधील विद्यार्थी आजही प्राथमिक सुविधेवाचून वंचित असल्याबाबत

(४३) ९०५९ (०९-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) नालासोपारा पूर्वेकडील वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हददीत पेल्हार येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमधील विद्यार्थी आजही प्राथमिक सुविधेवाचून वंचित असून त्यांना अशुध्द पाणी प्यावे लागत आहे तसेच तेथील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म व बूट सुध्दा देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) सदरहू शाळेत प्राथमिक सुविधा नसल्यामुळे तेथे शिक्षण घेणा-या सुमारे २५० हून अधिक मुलांना आजही अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म, बूट तसेच मुलभूत सुविधा, शुध्द पाणी न पुरविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांना उक्त सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१५) :(१) नाही.

(२) नाही.

(३) सदरहू शाळेतील पात्र लाभार्थ्यांना शालेय युनिफॉर्म, बुट,पाठयपुस्तके,मुलभूत सुविधा व शुध्द पाणी याचा लाभ दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षात २०१३-१४ मध्ये अभियांत्रिकी विभागातील ३२,४०० जागा रिक्त राहिल्याबाबत

(४४) ९०७३ (०८-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षात २०१३-१४ मध्ये सुमारे ५२ हजार ४०० जागा रिक्त राहील्या होत्या तसेच इतरही अभ्यासक्रमांमध्ये रिक्त जागांची संख्या लक्षणीय असल्यामुळे अभियांत्रिकी पदवीकांचा नव्हे तर औषधनिर्माण शास्त्र, व्यवस्थापन आदी तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांच्या प्रश्नावर काय करता येईल यावर विचार करण्यासाठी मांटुग्याच्या इन्स्टीट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरु डॉ.गणपती यादव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालाच्या मुख्य शिफारशी काय आहेत व त्यावर शासनाने कोणते निर्णय घेतले आहेत,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :(१) होय.

(२) डॉ.जी.डी.यादव, कुलगुरु, रसायन संस्था, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालात प्रामुख्याने व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील मंजूर प्रवेशक्षमतेच्या तुलनेत रिक्त जागांचे प्रमाण, शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता टिकविण्यासाठी शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी काही शिफारशीची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या शिखर संस्था, शासन, विद्यापीठ व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावरुन करावयाची आहे. या संदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विवा महाविद्यालय (ता.वसई) येथे एम.एच.टी-सी.ई.टी.चे उपकेंद्र सुरु करण्याबाबत

(४५) ९०७५ (०९-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई येथील विवा महाविद्यालय येथे एम.एच.टी-सी.ई.टी.चे उपकेंद्र सुरु करण्यात यावे अशा आशयाची मागणी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महापौरांनी दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी तसेच तेथील लोकप्रतिनिधी मा.वैद्यकीय शिक्षणमंत्री यांचेकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) सदरहू मागणीबाबत अद्यापी निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) उक्त ठिकाणी सदरील महाविद्यालय उभारण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) :(१) होय.

(२), (३) व (४) एमएचटी-सीईटी या सामाईकप्रवेश परीक्षेच्या आयोजनाकरिता प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना केंद्र प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात येत असून सदर परीक्षेचे गोपनीय साहित्य प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा कोषागारामध्ये ठेवण्यात येते. त्यामुळे सदर परीक्षेच्या आयोजनाकरीता गोपनियता, प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींमध्ये सुसूत्रता याची या कारणांसाठी परीक्षा फक्त जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात येते.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या एमएच-सीईटी-२०१५ करीता नवनिर्मित पालघर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी परीक्षेचे केंद्र ठेवण्यात आले होते.

ठाणे जिल्हापरिषदेला राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत मिळालेल्या २८ कोटी रुपयांचा निधीचा उपयोग न करता शासनाकडे वर्ग केल्याबाबत

(४६) ९१०० (०७-०४-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२-१३ व २०१३-१४ या २ वर्षाकरीता ठाणे जिल्हापरिषदेला राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत एकूण किती निधी प्राप्त झाला

(२) सदरहू प्राप्त झालेल्या निधीतून ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील एकूण किती लाभार्थींना घरकुल योजनेचा फायदा मिळाला

(३) ठाणे जिल्हा परिषदेला सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या सुमारे २८ कोटी रुपयांचा निधी पुन्हा राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, गरजू लाभार्थिना या योजनेतून घरकुले न देता २८ कोटींचा निधी परत शासनाकडे वर्ग करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :(१) सन २०१२-२०१३ व २०१३-१४ या २ वर्षाकरीता प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद ठाणे यांना राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत एकूण रु. ३२९९.८७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) सदर निधीमधून ठाणे जिल्ह्यात १८ व पालघर जिल्ह्यात ७२६ अशा एकूण ७४४ लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.
(३) होय, खरे आहे.
(४) घरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रतीक्षा यादीत लाभार्थी शिल्लक नसल्याने ठाणे जिल्हा परिषदेकडे शिल्लक असलेला निधी व त्यावरील जमा व्याज मिळूण एकूण रु.२९,१०,३१,१७०/- निधी शासनास परत करण्यात आला आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय मार्ग क्र. ८ वर वसई तालुक्याच्या हद्दीत ३०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय सुरू करण्याबाबत

(४७) ९१०८ (०७-०४-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय मार्ग क्र.८ वर वसई तालुक्यांच्या (जि.ठाणे) हद्दीत ३०० खाटांचे सुसज्ज रूग्णालय सुरू करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ रोजी वा तदनंतर आजमितीस सातत्याने लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसधारण कारणे काय आहेत,
(४) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय मार्गावर सातत्याने असलेली आदीवासी लोकसंख्या यांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध होण्यादृष्टीने विनाविलंब वसई तालुक्याच्या हद्दीत मागणीप्रमाणे ३०० खाटांच्या सुसज्ज रूग्णालयास मंजूरी मिळून ते लवकरात लवकर कार्यान्वित होण्यादृष्टीने शासनचे धोरण काय राहणार आहे ?

डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखड्यानुसार वसई येथे दिनांक ०९.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मनोर येथे ग्रामीण रुग्णालयाचे २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन व ट्रामा केअर युनीटची स्थापना करण्यास शासन निर्णय दिनांक १७.०१.२०१३ अन्वये मान्यता दिली आहे. ग्रामीण रुग्णालय, पालघरचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिली आहे. त्याशिवाय ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, विरार, ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, कासा, १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, डहाणू, ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय तलासरी कार्यान्वित असल्याने महामार्गावरील अपघात ग्रस्तांवर व आदिवासींवर तातडीने उपचार करण्यात येतात.

विंचुर (ता.निफाड, जि.नाशिक) येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबत.

(४८) ९१९६ (०६-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विंचुर, (ता.निफाड, जि.नाशिक) येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात यावी अशी स्थानिक जनतेची मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये मा.गृह राज्यमंत्री, यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१५) :(१) होय.

(२) विंचुर पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा उचित प्रस्ताव पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचेकडून मागविला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयातील उद्योग बंद असल्याबाबत

(४९) ९२०६ (०९-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात सुमारे २००० हजार उद्योग बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ ला निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या उद्योगांपैकी काही उद्योग हे परराज्यात स्थलांतरीत होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा उद्योगांचे होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी तसेच उद्योगांना नवसंजिवनी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (११-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

सन २००८ च्या लघु उद्योगांच्या चौथ्या प्रगणनेच्या सर्वेक्षणानुसार माहे मार्च, २००७ अखेर नोंदणीकृत असलेल्या एकूण ७६०३ घटकांपैकी बंद आढळलेल्या घटकांची संख्या सुमारे २०९२ इतकी होती. नाशिक जिल्ह्यात माहे मार्च, २०१५ अखेर एकूण १७३२४ उद्योग घटक स्थापित आहेत.

(२) हे खरे नाही.

स्थापित उद्योगांपैकी दुस-या राज्यात स्थलांतरीत होण्याकरिता कोणत्याही घटकांचे निवेदन/अर्ज प्राप्त झालेले नाही.

(३) राज्यात नवीन उद्योग यावेत व उद्योग घटक बंद पडू नये यासाठी महाराष्ट्र शासनाने औद्योगिक धोरण २०१३ जाहीर केले असून त्याची अंमलबजावणी माहे एप्रिल, २०१३ पासून सुरु झाली आहे. सदर धोरणात मागील धोरणापेक्षा अधिकच्या सोयी सवलतीचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिकचा दिल्ली-मुंबई कॉरिडॉर या प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेला नसल्याबाबत

(५०) ९२०७ (०९-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिल्ली-मुंबई कॉरिडॉर या प्रकल्पामध्ये नाशिकचा समावेश करण्यात आलेला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिकमध्ये सर्व सोयींची उपलब्धता असूनही या शहराचे प्रकल्पामध्ये समावेश न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पामध्ये नाशिकचा समावेश करण्यात यावा अशी मागणी उद्योजकांची असून तशी विनंती मा.मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

दिल्ली -मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पात इगतपुरी-नाशिक, सिन्नर या औद्योगिक क्षेत्राचा समावेश यापूर्वीच करण्यात आलेला आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी पाणी इतर अडचणी येत असल्यामुळे सदर प्रकल्पासंबंधीची कार्यवाही तात्पुरती स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११/०५/२०१५ रोजी पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत इगतपुरी-नाशिक,सिन्नर या औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी काय उपाय योजना करता येईल. यासंबंधीचा प्रस्ताव सादर करावा अशा सुचना पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.